दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १८१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, मंगळवार, दि.११ फेब्रुवारी २०२५




## थोडक्यात

### कर्जाला वैतागुन शेतकऱ्याची आत्महत्या

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१०, नांदेड :** सततच्या नैसर्गिक अवकृपेने झालेल्या नापीकीमुळे कर्जबाजारीला वैतागुन अल्पभुधारक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची घटना रविवारी रोजी बिलोली तालुक्यातील केसराळी येथे घडली. गेल्या अनेक वर्षांपासुन नैसर्गिक अवकृपेने होत असलेल्या सततच्या नापीकीमुळे साईनाथ भुमा मुदलवार वय वर्षे ३८ या अल्पभुधारक शेतकऱ्यांनी कर्जाला वैतागुन आपल्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.९ फेब्रुवारी रविवार रोजी केसराळी येथे घडली. या घटनेचा पुढील तपास बिलोली पोलीस ठाण्याचे पो.नि. अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सगरोळी बिटचे पोलीस हेड कॉंनेस्टेबल सि.व्हि आंबेवार व पो.कॉं. जळकोटे हे करीत आहेत. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी एक मुलगा व मुलगी असा परीवार आहे.

### एकाच छत्राखाली शासनाच्या विविध सेवा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, ठाणे :** सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१३ जानेवारी २०२५ च्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय शासकीय व निम शासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांसाठी ७ कलमी कृती आराखडा दिला असून त्यात मुद्दा क्रमांक २ मध्ये नागरिकांना दैनंदिन जीवन सुकर व्हावे, याकरिता सातत्याने प्रयत्न करावेत, असे नमूद आहे.

त्यानुषंगाने नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या सेवा त्यांना एक छताखाली उपलब्ध करुन देण्यासाठी दि.९ फेब्रुवारी २०२५ पासून एकाच छत्राखाली विविध सेवा देण्यासंबंधीचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेंतर्गत शासनाच्या विविध विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा व प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता नागरिकांना एकाच ठिकाणी अर्ज करणे व दाखला प्राप्त करणे शक्य होणार आहे. या सर्व सेवा शासनमान्य आधारकेंद्र, कॉमन सर्व्हिस सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र येथे नागरिकांकरिता उपलब्ध असणार आहेत.

## वेगळा पक्ष काढण्याच्या विधानावर पंकजा मुंडें म्हणाल्या...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** भारतीय जनता पक्षाच्या नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी रविवारी (९ फेब्रुवारी) नाशिकमधील एका कार्यक्रमात बोलताना एक मोठं विधान केलं होतं. गोपीनाथ मुंडेंवर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या एवढी मोठी आहे की एकत्रित केल्यास एखादा पक्ष उभा राहील, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आलं. मात्र, यानंतर आता पंकजा मुंडे यांनी त्यांच्या विधानासंदर्भात स्पष्टीकरण दिलं आहे. आता त्या विधानाचा अर्थ तुम्हाला जसा लावायचा तसा लावण्याचा प्रयत्न केला तरी तो अर्थ तसा निघणार नाही, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.

**पंकजा मुंडेंनी काय स्पष्टीकरण दिलं?**



नाशिकमध्ये एक गिरासे म्हणून डॉक्टर आहेत. त्यांनी माझ्याआधी भाषण केलं. तेव्हा त्यांनी सांगितलं की आम्ही गोपीनाथ मुंडे यांच्यावर खूप प्रेम करायचो. त्यांना अनेकदा भेटायचो. तेव्हा ते म्हणाले ताई तुम्हाला माहिती आहे का की गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणारे लोक एवढे आहेत ते मोजायला गेलं तर एक पक्ष निर्माण होईल असं ते म्हणाले. त्यांच्या विधानाला उत्तर देताना मी म्हटलं की, हो पक्ष निर्माण झालाच आहे. आता या पक्षाशी (भाजपा) देखील त्यांच्यावर (गोपीनाथ मुंडे) प्रेम करणारे लोक जोडले गेलेलेच आहेत. आता आता त्या विधानाचा अर्थ तुम्हाला जसा लावायचा तसा लावण्याचा प्रयत्न केला तरी तो अर्थ तसा निघणार नाही, असं पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

**पंकजा मुंडेंनी काय विधान केलं होतं?**

गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या एवढी मोठी आहे की एकत्रित केल्यास एखादा पक्ष उभा राहील, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं होतं. तसेच गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणारे आणि पर्यायाने माझ्यावर प्रेम करणारे हे सर्व लोक गोपीनाथ मुंडे यांची मुलगी म्हणून माझ्याबरोबर जोडले गेलेले आहेत. लोक गुणांचा वारसा स्वीकारतात. गुणांवर प्रेम करतात. पण गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणाऱ्यांचा पक्ष उभा आहे. भारतीय जनता पक्षाच्या जन्मापासून गोपीनाथ मुंडे यांनी काम करून पक्ष उभा केला, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं होतं.

**छगन भुजबळ काय म्हणाले?**

कोणीही स्वतंत्र पक्ष काढू शकतं. आता पंकजा मुंडे म्हणतात त्या प्रमाणे मोठा पक्ष असेल. मात्र, माझं म्हणणं असं आहे की एका समाजावर पक्ष काढणं आणि त्यावर यश मिळवणं हे कितपत यशदायी असेल याची मला कल्पना नाही. मग कोणताही समाज असो आपल्यासमोर अशी अनेक उदाहरणे आहेत. वेगवेगळ्या घटकांनी वेगवेगळे पक्ष काढलेत. मग ते किती चालले किती नाही याचा लेखाजोखा त्यांनी घेतला पाहिजे. याचा अभ्यास त्यांनी केला असेल. पंकजा मुंडे यांनी म्हटलं असलं तरी त्या लगेच पक्ष काढतील असं मला तरी काय वाटत नाही. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आपण असा घेऊ या की दिवंगत गोपीनाथ मुंडे यांना मानणारा वर्ग मोठा आहे, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

## गोर बंजारा समाजाचा जनआक्रोश मोर्चा


### स्मारक झाले नाही तर महाराष्ट्रभर करणार रास्ता रोको..

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१०, येरवडा (पुणे) :** येरवडा येथील चिमा उद्यानात क्रांतिकारी सेवालाल महाराज यांच्या पुतळ्याचे बांधकाम सुरु करण्यात यावे यासाठी आज दि.१० रोजी येरवडा ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालययात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

वर्क ऑर्डर पास असून निधी पास असून आमदार निधीचे पैसे मिळाले असताना देखील कामाला विलंब का होत आहे.?

आम्ही कुठली भीक मागायला आलो नाही, कुठल्या योजनेचा प्रस्ताव आणला नाही.. तुमचे बजेट पास झालेले आहे.. आमचं काम पूर्ण करून द्या अश्या प्रकारचे सवाल जिल्हाधिाऱ्यांना विचारत पुतळ्याचे





बांधकाम पूर्ण होवु द्यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आय गटाचे) प्रदेशाध्यक्ष सुहास बनसोडे यांनी यावेळी केली.

स्मारकाचे लवकरात लवकर काम करण्यात यावे. अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी गोर सेना संघटनेचे अध्यक्ष संदेश चव्हाण व राज चव्हाण यांनी दिला..

बेजेट पास असून देखील कामाला विलंब होत आहे. काही कंटक अधिकारी, राजकीय हस्तक्षेप करून निधी वर्गीकरणच्या नियोजनात असतील तर अधिकारी यांना देखील कारवाई ला सामोरे जावे लागेल अशी संतप्त प्रतिक्रिया येरवडा भागातील माजी नगरसेविका श्वेता चव्हाण यांची होती. शंकर चव्हाण, राज चव्हाण यांचा नेतृत्वाखाली आजच्या या जन आक्रोश मोर्चाचे नियोजन करण्यात आले होते.

या प्रशासनाचे शासनासाचे करायचे काय खाली डोके वर पाय या शब्दात यावेळी निषेध करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजाचे नेते, नागरिक मोठ्या उपस्थित होते.

## ज्युदोत महाराष्ट्राच्या श्रध्दा चोपडेचे सुवर्ण यश

### - आकांक्षा शिंदेला रौप्यपदक -

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, डेहराडून :** ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ज्युदोमध्ये महाराष्ट्राच्या श्रध्दा चोपडे हिने सुवर्णपदक, तर आकांक्षा शिंदे हिने रौप्यपदकाची कमाई केली.

मोनल संकुलात सुरू असलेल्या ज्युदो स्पर्धेत महिलांच्या ५२ किलो गटात श्रद्धा हिने अंतिम लढतीत महेरुख मकवाना या गुजरातच्या खेळाडूवर एकतर्फी विजय मिळविला. या स्पर्धेतील तिचे हे पहिलेच पदक आहे. यापूर्वी तिने वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदके जिंकली आहेत. त्याखेरीज तिने आफ्रिकन खुल्या स्पर्धेतही एक रौप्य व एक कांस्यपदक जिंकले आहे. १९ वर्षाची श्रद्धा ही यशपाल सोळंकी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर येथील प्रशिक्षण केंद्रात सराव करीत आहे. तिचे वडील कडूबा हे देखील राष्ट्रीय कुस्ती व जुदोपटू आहेत त्यांच्याकडूनच



श्रध्दा चोपडे

प्रेरणा घेऊन तिने ज्युदोमध्ये करिअर केले आहे. सुवर्णपदक जिंकण्याची मला खात्री होती. कारण पॅरिस येथे नुकतेच मी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सराव शिबिरात अद्यावत प्रशिक्षण घेतले आहे. तसेच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये देखील माझी कामगिरी सातत्यपूर्ण झाली आहे, असे श्रद्धा हिने सांगितले.

४८ किलो गटाच्या अंतिम लढतीत



आकांक्षा शिंदे

आकांक्षा शिंदे हिने उत्तर प्रदेशच्या अस्मिता डे हिला कडवी लढत दिली. मात्र, अस्मिताने अडीच मिनिटांनंतर एका गुणांची कमाई करीत गुणांचे खाते उघडले. त्यानंतर आकांक्षाने गुण मिळविण्यासाठी जीवाचे रान केले. मात्र, बचावात्मक पवित्रा घेतलेल्या अस्मिताने आकांक्षाला गुण मिळणार नाही याची दक्षता घेत सुवर्ण पदकावर मोहोर उमटवली. आकांक्षाला अखेर रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. आकांक्षा ही नाशिकची खेळाडू असून तिने या स्पर्धेत प्रथमच पदक जिंकले आहे. यापूर्वी तिने विविध वयोगटातील गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत अर्धा डझन पदके जिंकली आहेत. नाशिक येथील एच ए एल महाविद्यालयात ती वाणिज्य शाखेचा अभ्यासक्रम करीत आहे. १९ वर्षीय खेळाडू आकांक्षा हिचे ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न आहे.

पुरुषांच्या ६० किलो गटातील कांस्यपदकाच्या लढतीत महाराष्ट्राच्या श्रावण शेडगे हिला उत्तर प्रदेशच्या मोनी शर्मा याच्याकडून पराभव पत्करावा लागला. या लढतीत श्रावण याने मोनी याला चिवट लढत दिली. मात्र, सडनडेथपर्यंत झालेल्या लढतीत गोल्डन स्कोअरच्या जोरावर मोनीने बाजी मारत कांस्यपदक जिंकले.

## क्षुल्लक कारणावरून... दारुड्याने आईला पेटवले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, बुलडाणा :** जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील संग्रामपूर तालुका एका दुर्दैवी क्रूर घटनेने हादरला! दारूच्या आहारी गेलेल्या मुलाने आपल्या जन्मदात्या आईला क्षुल्लक कारणावरून पेटवून दिले. यामुळे दुर्दैवी माता गंभीररित्या भाजली असून मृत्युशी झुंज देत आहे. संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा येथे रविवारी संध्याकाळी घडलेल्या या भीषण घटनेने समाजमन सुन्न झाले आहे. गंभीररित्या भाजलेल्या मातेवर शेगाव येथील सई बाई मोटे शासकीय उप जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. गौरव अरुण देशमुख असे आरोपी पुत्राचे नाव आहे. गौरव संध्याकाळी पातुर्डा येथील आपल्या घरी आला. यावेळी तो दारू प्यालेला होता. त्याचे आईसोबत ( मीना देशमुख) साडी परत मागण्यांवरून भांडण झाले. साडी दिली नाही तर तुला आग लावुन पेटवून देण्याची धमकी आईला दिली. यावर बिचाऱ्या आईने त्याची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र दारूच्या नशेत असल्याने काही एक न ऐकता साडी काढून देण्याचा तगादा लावला. यामुळे मीना देशमुख गयावया करीत असतानाच आरोपी गौरव याने आईच्या कपड्यांना आग लावून पेटवून दिले.जिवाच्या आकांताने महिला आरडा ओरड करत असल्याने गावकरी धावून आले. माहिती कळतच तामगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी, अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रुग्णवाहिकाद्वारे महिलेला शेगाव येथील शासकीय रूग्णालयात हलविले.

वडील अरुण देशमुख यांनी तामगाव पोलीसात फिर्याद दिली. त्यामध्ये मुलगा गौरव दारु पिऊन नेहमी मला व माझ्या पत्नीला शिवीगाळ करतो व जिवाने मारण्याची धमकी देत असल्याचे नमूद केले. पोलीसांनी आरोपी गौरव अरूण देशमुख विरूद्ध गुन्हा दाखल केला.




## आता भीक मागणाऱ्यालाही दंड

मध्य प्रदेशातल्या भोपाळमध्ये यापुढे भीक मागणाऱ्याला आणि देणाऱ्याला दंड ठोठावला जाणार आहे.

भारतात भीक मागणं हा कायद्याने गुन्हा असूनही कोणत्याही शहरात-गावात रेल्वे स्थानक, एसटी स्टँड, रिक्षा-टॅक्सी थांबे, ट्रॅफिक सिग्नल्स, देवळं, बाजार अशा ठिकाणी भिकारी हमखास दिसतात. भारतीय न्याय संहिता लागू झाल्यापासून सारं काही या नव्या संहितेमुळेच शक्य झालं, असं भासवलं जाऊ लागलं असलं, तरी मूळ भारतीय दंड संहितेतही हा नियम समाविष्ट होता. अल्पवयीनांचं अपहरण करून त्यांना भीक मागण्यास भाग पाडणं हा भादविच्या कलम ३६३-ए नुसार आणि सार्वजनिक ठिकाणी भीक मागणं हा कलम २६८ नुसार दंडनीय गुन्हा होता. आता भारतीय न्याय संहितेत कलम १४३ नुसार हा गुन्हा ठरवण्यात आला आहे. अशाप्रकारे कारवाई केलेल्या भिकाऱ्यांसाठी पूर्वीपासून ठिकठिकाणी भिक्षेकरी स्वीकारगृहं होती, आजही आहेत. (त्यांची अवस्था काय, हा भाग अलाहिदा) पण कुठे आणि किती कारवाई करणार म्हणून सोडून दिल्या जाणाऱ्या गुन्ह्यांपैकीच हाही एक गुन्हा. आता मध्य प्रदेशात या मुद्द्यावर काम करण्यास सुरुवात झाल्याचं दिसतं. पण त्यामागचं उद्दीष्ट किती प्रामाणिक आहे, यावर हे काम किती काळ टिकेल, हे अवलंबून असेल. भोपाळमध्ये येत्या २४ आणि २५ फेब्रुवारीला ग्लोबल इनव्हेस्टर्स समिट होणार आहे. त्यामुळे जी २० च्या वेळी जसं दिल्लीत रातोरात शेकडो भिकाऱ्यांची धरपकड करून त्यांना परिषदेच्या काळापुरतं शहरापासून दूर नेऊन ठेवण्यात आलं होतं तसाच तर हा प्रकार नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या शंका फोल ठरल्या तर उत्तमच. अन्यथा हे गरिबी हटवण्याऐवजी गरिबांना हटवणंच ठरेल. भोपाळविषयी काही प्रमाणात आशा वाटते कारण, मध्य प्रदेशातल्याच इंदूरमध्येही डिसेंबरपासून भीक मागण्यावर बंदी घालण्यात आली आहे आणि तिची अंमलबजावणी अद्याप तरी सुरू आहे.

पण केवळ दंडात्मक कारवाई किंवा शिक्षा करून भिकाऱ्यांचा प्रश्न कायमचा सुटेल का? त्यांना उदरनिर्वाहाचं पर्यायी साधनही मिळवून द्यावं लागेल, असं म्हणणं सोपं आहे, पण ज्या देशात बेरोजगारी ही प्रचंड मोठी समस्या आहे तिथे भिकाऱ्यांना रोजगार देणं हे अशक्य कोटीतलं लक्ष्य ठरतं. त्यात भर म्हणजे बहुतेकांना भीक मागण्यात काही गैर आहे, असं वाटत नाही. अनेकांसाठी तो एक व्यवसाय किंवा जोडधंदा आहे.

दोन मुद्द्यांचा विचार करणं महत्त्वाचं ठरतं. पहिला मुद्दा हा की सर्वच भिकारी गरीब आणि बिचारे असतात का? आणि दुसरा काही नाणी वा नोटा त्यांच्या हातावर टेकवून हा प्रश्न सुटू शकतो का? पहिल्या मुद्द्यांचा विचार करताना अमुक एका भिकऱ्याकडे इतके लाख रुपये आढळले वगैरे धाटणी बातम्या आठवतात. अर्थात सर्वच भिकारी लक्षाधीश नसतात. अंध, अपंग, वृद्ध व्यक्तींकडे अन्य पर्याय नसल्यास ते या मार्गाने उदरनिर्वाह करतात. प्रत्येकाचे पैसे मागण्याचे मार्ग वेगळे. काही जण फुगे, पेन, खेळणी अशा वस्तू विकण्याच्या बहाण्याने जवळ येतात आणि कोणी खरेदी करो वा न करो, ते त्यांच्याकडे पैसे मागू लागतात. बहुतेकदा शॉपिंग मॉल्स, केक-आईस्क्रीम-भेटवस्तूंची दुकानं, चौपाट्या अशा ठिकाणी अशा वस्तू विकत फिरणारी कुटुंब दिसतात. आमची गाडी चुकली घरी जाण्यासाठी तिकीटाचे पैसे द्या किंवा एका वेळच्या जेवणापुरते पैसे द्या, असं सांगणारे आणि पुन्हा पुन्हा त्याच रस्त्यावर दिसणारेही अनेक. यातील सर्वांत चिंताजनक प्रकार म्हणजे भीक मागणारी लहान मुलं. काहींना त्यांचे आई-वडीलच पैसे मागण्यास उद्युक्त करतात, मात्र अनेक लहान मुलं अनाथ असतात, अपहरण केलेली असतात. ही मुलं गुन्हेगारी टोळ्यांची बळी ठरतात. पोलिसांचे दंडुके, कुपोषण, लैंगिक शोषण अशा अनेक समस्यांतून त्यांना जावं लागतं. भीक मागणाऱ्यांत तृतीयपंथींचं प्रमाण मोठं आहे. त्यातही प्रत्यक्षात पुरुष असताना तृतीयपंथी असल्याचं भासवणारे कमी नाहीत. पाच-दहा रुपयांचं नाणं हातावर टेकवलं तर अधिक पैशांसाठी हटून बसणं, पैसे दिले नाहीत, तर शाप लागेल वगैरे धमकावणं, एक जण पैशांसाठी विनवण्या करत असताना दुसऱ्याने पाकिट किंवा फोन लंपास करणं, मिळालेल्या पैशांतून विड्या फुंकणं, दारू पिणं असे प्रकार करणाऱ्यांचं प्रमाण मोठं आहे. अंमली पदार्थांचं व्यसन असणारे आणि केवळ ते भागवण्यासाठी भीक मागणारेही आहेत.

# 'हे' चाळे रोखायलाच हवेत !

काळ जसा सरत गेला तसा देश आधुनिकीकरणाकडे मार्गक्रमण करू लागला. माणसाचे राहणीमान उंचावू लागले. पूर्वी कधीतरी लग्न समारंभात किंवा मोठ्या कार्यक्रमात दिसणारी सुटाबुटातील माणसे आता लोकल ट्रेनमध्येही दिसू लागली आहेत. पूर्वी खासगी गाड्या कमी असल्याने रस्ते ओस असायचे, आता शहरासारख्या ठिकाणी गाड्या एव्हढ्या वाढल्या आहेत कि रस्ते कमी पडू लागले आहेत. लँडलाईन, पीसीओ, पेजर जाऊन मोबाईल आले, आता त्यातही क्रांती होऊन सर्वांना परवडणारे स्मार्ट फोन प्रत्येकाकडे आले. घरोघरी स्मार्ट टीव्ही आले, फ्रिज आणि धुलाई यंत्र आले. शहरांमध्ये आता चाळींतूनही घरोघरी वातानुकूलित यंत्रे(एसी) बसवली जाऊ लागली आहेत. प्रत्येकाच्या हाती स्मार्ट फोन आला आणि त्यामध्ये अनलिमिटेड डाटा पॅकही आला. सोशल मीडियाचे अनेक प्लॅटफॉर्म्स तयार झाले त्यावर प्रतिदिन रेंगाळणाऱ्यांची संख्याही वाढली, शेजारपाजारचे ४-५ मित्र दुरावले आणि सामाजिक माध्यमांवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स जोडले गेले. दुरदर्शनचा काळ संपला, वेगवेगळे चॅनल्स आले, आता तर ओटीटी प्लॅटफॉर्म्स सुद्धा आले. युट्युबचा पसारा अवास्तव वाढला आणि या युट्युबवरील चित्रपट, मालिका, खेळांचे सामने, खाद्यपदार्थांच्या रेसिपी, इंटरनेटच्या साहायाने स्मार्ट टीव्हीवर मोठ्या स्क्रीनवर पाहण्याची सुविधा उपलब्ध झाली. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर नवनवीन चित्रपट आणि वेब सिरीज यांचे अक्षरशः पेव फुटले.

एक काळ असा होता जेव्हा चित्रपटात प्रेमप्रसंग दाखवण्यासाठी दोन फुलांचा वापर केला जात असे, आता काळ इतका पुढे गेला आहे की चित्रपट परीक्षण मंडळाकडून 'अ प्रमाणपत्र' घेऊन शयनगृहातील




प्रणयदृश्ये खुलेआमपणे पडद्यावर दाखवली जाऊ लागली आहेत. आयटम साँग , चुंबनदृश्ये, शिव्यांचा मुक्त वापर आणि भडक दृश्यांशिवाय हल्लीचे चित्रपट पूर्णत्वाला येतच नाहीत. ओटीटी प्लॅटफॉर्म्सना सेन्सॉरचेही बंधन नसल्याने येथील प्रौढांसाठी बनवण्यात आलेल्या वेब सिरीज शाळेतील मुलेही आपल्या स्मार्ट फोन्सवर चवीने पाहू लागली आहेत. चित्रपटातील अभिनेत्रींचा तोकड्या कपड्यांतील वावर आताच्या तरुणींना स्टाईल स्टेटमेंट वाटू लागले आहे. त्यामुळे महाविद्यालयात आणि कार्यालयांत तोकडे कपडे घालून जाणाऱ्या अनेक तरुणी प्रतिदिन बस, रेल्वे आणि रहदारीच्या ठिकाणी दिसू लागल्या आहेत. पौगंडावस्थेतच मुलांच्या हाती स्मार्ट फोन्स आल्याने त्यावर पॉर्न चित्रपट पाहणाऱ्या मुलांचे प्रमाणही गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहे. पूर्वी कधीतरी निर्जन स्थळी दिसणारी प्रेमी युगुले आज गर्दीच्या, रहदारीच्या ठिकाणी सर्रासपणे दिसू लागली आहेत. ट्रेन, बस, पादचारी पूल, स्कायवॉक, बगीचे, तळी, नदी-समुद्र किनारे, बस आणि रेल्वे स्थानक यांवर यांचे चाळे सर्वांदेखत सुरु असतात. यामध्ये १५-१६ वर्षांच्या मुला-मुलींचाही सहभाग असतो. चित्रपट-मालिकांमध्ये दाखवण्यात येणारी भडक प्रणयदृश्ये, मुलांच्या हाती आलेले स्मार्ट फोन्स, त्यांवरील इंटरनेटचा स्वैर वापर, पालकांनी मुलांना दिलेली अवास्तव मोकळीक आणि मुलांवरील पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव ही यामागील प्रमुख कारणे आहेत. सध्या सुरु असलेला 'व्हॅलेंटाईन वीक' म्हणजे यांच्यासाठी पर्वणीच आहे. रोजच्या रहदारीच्या वाटेवरील यांचे चाळे पाहून सभ्य माणसे त्यांच्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करताना आढळतात, पालक आपल्या लहान मुलांची नजर त्यांच्यावर पडणार नाही याची काळजी घेताना दिसतात; मात्र त्यांना हटकण्याचा किंवा जाब विचारण्याचा प्रयत्न करताना कुणीच दिसत नाहीत. एखादी संस्कृतीरक्षक संघटना यांच्यावर कधीतरी धडक कारवाई करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा समाजातील तथाकथित प्रेमाचे ठेकेदार जागे होतात आणि आणि या चाळ्यांना विरोध करणाऱ्यांना तालिबान्यांची उपमा देऊन यांच्यावर प्रसिद्धी माध्यमांतून गळे काढतात. पोलीसही या चाळ्यांकडे दुर्लक्ष करताना आढळतात. परिणामी या आधुनिक प्रेमवीरांचे धाडस दिवसागणिक वाढत चालले आहे. यामध्ये आपली मुले नाहीत, म्हणून आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करत असू, तर अन्य कुठेतरी आपली मुलेसुद्धा हेच करत नसतील याची शाश्वती आपण देऊ शकतो का ? आपण भारतात राहतो. येथील संस्कृती असल्या स्वैराचाराला मुळीच मान्यता देत नाही. त्यामुळे संस्कृतीला काळिमा फासणारे कृत्य रोखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा!

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरा करण्याचे त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोज डे पासून सुरू झालेला हा डेज चा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, प्रॉमिस डे, टेडी डे, चॉकलेट डे, हग डे, किस डे असे विविध प्रकारचे डे येतात. डेज चा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण येत असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेज च्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील हास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त असावा असे



काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांना भेटवस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डे ची गरज नसते. बरे हे डे पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात तर डेज चे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, सिस्टर्स डे, ब्रदर्स डे, डॉटर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेज ची झाली आहे. सोशल मीडियावर ॲक्टीव असणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडतो. वर्षभर कधी आई वडीलांप्रती आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप ॲक्टीव असतात. जन्मदात्या आई वडिलांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डे ची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेज ची गरज आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने विचारून पहावा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## शंकरपट..

गावगावात स्पर्धा
रंगू लागे शंकरपट
शिस्त बध्द उत्सव
उत्साह रे कैक पट

वेग पाहून बैलांचा
पायआपले लटपट
गाड्याशृंगारलेल्या
धावू पाहे झट पट

वारसा रे परंपराचा
दृश्य दावी बोधपट
कुणा नको विजय
करती सारे खटपट

कधी बैला मारबसे
धावा बाबा पटापट
मुके जीव धावतात
जीव तोडून सटसट

राजकारण घुसलेले
खुर्चीमाझी बळकट
बेरंग करी उद्येशांचा
ईर्षा मत्सर कळकट

नशेबाजी कु प्रवृत्ती
स्पर्धे डागळे विच्कट
प्रकार करे आचकट
भगेंद्र बनवी धस्कट

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# धानोरा-यात्रा महोत्सव

धानोरा हे बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील एक तीर्थ आहे. स्थानिक बोलीभाषेत या तीर्थाला धानोरा महासिद्धी असेही म्हणतात कारण, येथे ८४ सिद्धीपैकी एकात सिद्ध असे महसिद्ध महाराजांचे प्रचीन मंदिर व समाधीस्थळ आहे. असलगावापासून वायव्येस ६ किमी तर तालुका जळगांव जामोद पासून सुद्धा ६ किमी अंतरावर हे स्थान आहे. सातपुड्याच्या पवित्र पर्वत रांगेच्या बाजूला वसलेले हे तिर्थ आहे. या पवित्र तीर्थक्षेत्री माघ शुक्ल पौर्णिमेला दरवर्षी यात्रा भरते. गावाच्या उत्तरेस चाळीस फुटी महाद्वार आहे. त्यावर सदैव भगवा ध्वज फडकत असतो. महाद्वारातून आत प्रवेश केल्यावर नयनरम्य मुख्य मंदिर आहे. मंदिरावर पंधरा फूट उंचीवर पांढराशुभ्र ध्वज सतत फडकत असतो. मंदिरासमोर ३० फूट उंचीची दीपमाळ आहे. त्याचबरोबर ३५ फूट लांबीची काठी साजवून उभी करतात..मंदिरासमोर छान निंबाची वृक्ष आहेत व तेथे चबूतरे बनवले आहे.यावर यात्रेकरू काही वेळ त्यावर बसून विसावा घेतात.यात्रेदरम्यान सात दिवस अगोदर श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या प्रेरणेने ज्ञानेश्वरी पारायणाची प्रथा चालू केली आहे व ती अविरत चालू आहे. त्याचबरोबर पाच दिवस अगोदर श्री महासिद्ध यांचे नवरात्र बसतात. मंदिराचा परिसर अतिशय नयनरम्य व आकर्षक आहे. मंदिराच्या रचनेवरून प्रचीन कलाकृतीचे दर्शन घडते.

या यात्रा महोत्सवादरम्यान आजूबाजूच्या खेड्यातील लोक दर्शन व यात्रेचा लुटण्यासाठी येतात. नोकरीनिमित्त व रोजगारसाठी बाहेरगावी गेलेले गावातील लोक यात्रेनिमित्त महासिद्ध महारांच्या चरणी नत मस्तक होण्यासाठी येतात. पंचक्रोशीतील दुकानदार आपापले दुकाने घेऊन तेथे लावतात. कटलरी, लहान मुलांचे खेळणे, वेगवेगळ्या प्रदर्शनीय वस्तूंचे दुकान तेथे थाटल्या जातात.काहीशी उन्हाळ्याची चाहूल लागल्यामुळे ताज्या उसाच्या रसाच्या गाड्या तसेच इतर थंड पेय यांची दुकाने अन, हातठेले दिसून येतात. त्याचबरोर चहा, नास्तापाणी व भोजनसाठी हॉटेल उभारल्या जातात. त्याचबरोबर अगदी शिस्तीत कापडी छताच्या राहुट्या उभारून अस्सल गावठी मसाला वापरून फरसाण व प्रसादाची दुकाने ही थाटलेले दिसून येतात.त्यात विशेषत: गाठी शेव, रेवडी, गोडशेव हे सर्व पदार्थ खेड्यातील लोक त्यांचा पाक कलेने बनवतात. एका बारीक लाकडी काठीला गुलाबी रंगाचा बुढढी के बाल हा गोड खाद्य पदार्थ लहान मोठे सर्वजण अगदी आवडीने खातात. मोठ्या पडद्याच्या टॉकीज, तमाशा मंडळ, रहाट पाळणे, त्याचबरोबर लहान मुलांसाठी मिनी ट्रेन, गोलकार फिरणाऱ्या छोट्या कार सवारी लहान -मोठ्या सर्व स्तरावरील यात्रेकरूंचे मनोरंजन करतात. सर्कस, मौत का कुवा, यासारखे धाडसी खेळही येथे खेळले जातात. त्यामुळे लहान मुले, तरुण-तरुणी तसेच वृद्ध मंडळी या यात्रेत हजारोंच्या संख्येने पंचक्रोशीतीलच नव्हे तर महाराष्ट्र भाविक तथा हौशी मंडळी यात्रेत सहभागी होतात व यात्रेचा आनंद लुटतात. महाराष्ट्रातील ग्रामीण लोक परंपरेचा व सांस्कृतिक लोकजीवनाचा एक सुखद अनुभव घेतात.

या यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे जवळपास ३०० वर्षांपासून चालत आलेली परंपरा म्हणजेकाठी महोत्सव उल्लेखित २५ फुटी काठीला जवळपास पन्नास ते साठ जण दिवसरात मेहनत करून वेवगेगळ्या रंगींबेरंगी कापडानीआवरण लावून सजवतात. आकर्षक अश्या या काठीला पुष्पगुछ व छान मोरांचे पीस लावतात त्याचबरोबर ही छान सुंदर सजवलेली काठी दीपमाळेच्या बाजूला उभी करतात. जनरिती व चालीरीती शहरी भागातील काहींना अंधश्रद्धा किंवा भोळेभाबडे पणा वाटत असला तरी ग्रामीण जीवन जगण्याचा स्रोत आहे यामुळे वेगवेगळ्या जातीधर्मातील एकजुट राहतात. या उत्सवातून माणुसपाणाची ओळख पटते.जुनं ते सोनं या म्हणीप्रमाणे लोकांनी सध्याच्या काळात जुन्या गोष्टीची कास धरली आहे. आपण बघतोय आरोग्याच्या तक्रारी लक्षात घेता शहरातील लोकांना सुद्धा ग्रामीण जीवनाचा हेवा वाटू लागला आहे. त्या दृष्टिकोनातून चुलीवरील जेवणाची पसंदी दर्शवताय. यात्रेचे काहीसे तसेच आहे. ग्रामीण जीवनाची ओळख व सांस्कृतिक वारसा बघण्यासाठी उत्तरोत्तर यात्रेकरूंची गर्दी वाढलेली दिसून येत आहे. भौतिक आकर्षणा मुळे शहराकडे वळलेली लोक भविष्यात, जीवनातील एकलकोंडा घालव्यासाठी व आरोग्यदायी जीवनासाठी नक्कीच खेड्याकडे वळतील ग्रामीण लोकजीवनाचा व विविधतेने लोकपरंपरेचा सुखद अनुभव घेतील.

अश्याप्रकारे नेहमीचेच पर्यटन स्थळ बघून कंटाळले असणार तर, खेड्यातील लोकजीवनाचा व संस्कृतचीचा वारसा म्हनून जोपासल्या जाणाऱ्या सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरेचा अनुभव घेण्यासाठी या पवित्र स्थळाला व काठी महोत्सवाला आवश्य भेट द्या.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## रामनगर येथे सांस्कृतिक कला महोत्सव उत्साहात साजरा




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१०, जव्हार (पालघर) :** रामनगर सांस्कृतिक कला महोत्सवाच्या चौथ्या पर्वात बाल कलाकारांच्या शानदार शादरीकरणाने रामनगरी दुमदुमून गेली.जव्हार-डहाणू मार्ग लगत बारा कि.मी अंतरावर वसलेल्या रामनगर या छोट्याशा गावात गेल्या चार वर्षापासून अखंडपणे सुरू असलेल्या सांस्कृतिक कला महोत्सवाची परंपरा कायम राखत ग्रुप ग्रामपंचायत कासरवाडीचे लोकनियुक्त सरपंच कल्पेश राऊत यांच्यामार्फत दरवर्षी आयोजित केला जाणारा सांस्कृतिक कला महोत्सव रामनगर तरुणाईच्या योग्य नियोजनाच्या माध्यमातून या वर्षी सुद्धा मोठ्या उत्साहात पार पडला.दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या महोत्सवाच्या माध्यमातून बालकलाकारांना एक सांस्कृतिक कार्यक्रम ाच्या रूपाने ग्रामीण भागात मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे भावना व्यक्त केली जात आहे. शेकडो रसिक प्रेषकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कला महोत्सवात पंचक्रोशीतील नागरिकांनी आपली उपस्थिती लावून दिवसभर चाललेल्या या महोत्सवात महिलांचे अनेक प्रकारचे खेळ सुद्धा घेण्यात आले.या खेळात सहभागी झालेल्या व क्रमांक मिळवलेल्या महिलांना कल्पेश राऊत यांच्याकडून आकर्षक बक्षीसांचे प्रदान करण्यात आले तर सांस्कृतिक कला महोत्सवात वेगवेगळ्या गटातून क्रमांक मिळवलेल्या सहभागी स्पर्धकांना रोख रकमेच्या माध्यमातून बक्षीसांचे वितरण करून कलाकारांचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न राऊत यांनी केला.

या महोत्सवात गेल्या सहा वर्षांपूर्वी 'युवा सामर्थ्य प्रतिष्ठानने' सुरू करून दिलेल्या महिलांच्या हळदीकुंकू सोहळ्याची परंपरा कायम राखत ग्रामपंचायत सदस्या कल्याणीताई राऊत व इतर सदस्या यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याला महिलांनी भरभरून प्रतिसाद देऊन 'एक दिवस महिलांसाठी' या धोरणाचा अवलंब करीत रामनगर तरुणाईने आयोजित केलेल्या या महिलांच्या सोहळ्यात विविध खेळांचा सुद्धा समावेश करण्यात आला होता. दरम्यान महोत्सवाची सुरुवात करतांना सांस्कृतिक कला महोत्सवाचे अध्यक्ष विलास काकरा यांनी उपस्थित प्रमुख अतिथी शिवसेना जव्हार तालुकाप्रमुख विनायक राऊत सह ग्रामपंचायतच्या इतर सदस्यांचे स्वागत करून महोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. या कला महोत्सवाची प्रमोद शेंडे यांनी यशस्वीपणे सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडून राजेश खोटरा यांनी कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात आभार प्रदर्शन व्यक्त करीत सांस्कृतिक कला महोत्सवाच्या चौथ्या पर्वाची सांगता केली.

## कॉपीमुक्त ठाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री शिंदे यांचे पत्राद्वारे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, ठाणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली इ.१२ वी व इ.१० वी परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पाडाव्यात, यासाठी उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना पत्राद्वारे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांकरिता आपल्या आवाहनात उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले आहेत की, तुमच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे, यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे. भयमुक्त कॉपीमुक्त परीक्षा या संकल्पनेला बळ देण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा. शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून, ते तुमच्या ज्ञानवृध्दी आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी माझी सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे की, स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवा आणि प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करा. विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण मिळावे तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढेल यासाठी पालक व शिक्षकांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करावी.

ते पुढे म्हणाले आहेत की, आगामी परीक्षा काळात कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त व कॉपीमुक्त राहतील, यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी कटीबद्ध आहे. परीक्षांच्या धर्तीवर राज्यामध्ये कॉपी प्रकरणास पुर्णतः प्रतिबंध करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाद्वारे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. महाराष्ट्राची अस्मिता जोपासण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रामाणिकपणे आणि न्याय्य मार्गाने शिक्षणाला पुढे नेऊयात.

## बालबाजारातून व्यवहार ज्ञान वाढेल - नितीनकुमार भरगुडे




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.९, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळशी शाळेम ध्ये आनंददायी शनिवार अंतर्गत बालबाजाराचे आयोजन करण्यात आले.शाळेत अभ्यासाबरोबर इतर उपक्रम राबविण्यात येतात अशा वेगवेगळ्या उपक्रमातून विद्यार्थी वस्तूची खरेदी विक्री,पैशांचे देवाणघेवाण करतात.पळशी शाळेत असेच उपक्रम राबवावेत असे मा. नितीनकुमार भरगुडे पाटिल,माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद यांनी व्यक्त केले.

या बाल बाजारामध्ये फळभाज्या, फळे, पालेभाज्या, आप्पे, भेळ सँडविज, वडापाव, मंचुरियन, ओली भेळ, खरवज, सरबत, बिर्याणी, लाडू, कुरकुरे, खाद्यपदार्थ विक्रीस आणले होते. १३,२२५ रुपयांची विक्री झाली.सर्व विद्यार्थी व पालकांनी बाल बाजाराचा आनंद घेतला. ५वी च्या वर्ग सुरु करन्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पळशी ग्रामपंचायत सरपंच हेमाताई गायकवाड, उपसरपंच गजानन भरगुडे,ग्रामपंचायत सदस्य सुजित दगडे, कविता राऊत, शालेय व्यवस्थापन समि तीचे अध्यक्ष किरण राऊत, अमोल राऊत, माजी शिक्षण विस्तार अधिकारी नवनाथ भरगुडे , सर्व ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्य. समिति सदस्य, पालक, विद्यार्थी, उपस्थित होते.

## तलवारबाजीत ड्रायव्हरच्या मुलीचे यश, श्रुती जोशीने जिंकले कांस्यपदक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, उत्तराखंड :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या श्रुती जोशीने कास्यपदक पटकावून तलवारबाजीत पदकाचे खाते उघडले. श्रुतीचे वडिल धर्मेंद्र जोशी हे नागपूरमध्ये खाजगी वाहनावर ड्रायव्हर असून तिचे हे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच पदक आहे. चौखाम्बा हॉलमध्ये सुरू असलेल्या तलवारबाजीतील सायबर प्रकारामध्ये नागपूरच्या श्रुती जोशीने नेत्रदीपक कामगिरी केली. साखळी सामन्यांमध्ये पहिल्या ३२ मध्ये अव्वल स्थान संपादन करून श्रुती पदकची दावेदार बनली होती.सलामीच्या लढतीत हरियाणाच्या मंजूवर १५-२ गुणांनी श्रुतीने दणदणीत विजय मिळविला. जम्मू काश्मीरच्या श्रेयावर १५-१० गुणांनी मात करून




तिने उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली. सुपर ८ लढतीत छत्तीसगडच्या वेदिका खुशीवर तिने १५-१० गुणांनी मोठा विजय संपादन करून पदक निश्चित केले. उपांत्य फेरीत तामिळनाडूची भवानी देवी विरूध्द महाराष्ट्राची श्रुती जोशी ही लढत लक्षवेधी ठरली. ऑलिम्पिकपटू असलेल्या भवानी देवी विरूध्द श्रुतीने चुरशीची झुंज दिली. अटीतटीच्या सामन्यांमध्ये १०- १५ गुणांनी भवानी देवी विजयी झाल्याने श्रुतीला कांस्यपदक प्राप्त झाले. भारतीय फेन्सिंग महासंघाचे सहसचिव व महाराष्ट्राचे उप पथक प्रमुख डॉ.उदय डोंगरे व नैनीतालच्या जिल्हा क्रीडा अधिकारी नर्मला पंत यांच्या हस्ते श्रुतीला पदक बहाल करण्यात आले.

गत गोवा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत २१ वर्षीय श्रुती सहभागी झाली होती. त्यानंतर खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याने तिची केरळमधील साईच्या प्रशिक्षक केंद्रात निवड झाली. अंकित गजबीय व सागर लागू तिचे प्रशिक्षक असून केरळमधील साईच्या केंद्रात कसून सराव करीत तीने हल्दवानीची स्पर्धेत यश मिळवले आहे. उत्तराखंडमधील स्पर्धेसाठी प्रशिक्षक आनंद वाघमारे, अजय त्रिभुवन, स्वामी पेरीया, शिल्पा नेने, सौरभ तोमर, राजू शिंदे , प्रकाश कटुळे व तलवारबाजी संघाचे व्यवस्थापक शेषनारायण लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. ऑलिम्पिक खेळाडू भवानी देवी विरूध्द लढताना चिवट झुंज मी दिली. असे सांगून श्रुती जोशी म्हणाली की, राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचे माझे ध्येय आहे. आता आशियाई स्पर्धेसाठी मी तयारी करणार आहे. देशासाठी खेळून आई-वडिलांचे नाव मला उज्वल्र करायचे आहे.

## आरोग्य सुविधा वाढवण्यासाठी खासदार सवरा यांची केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांच्यासोबत भेट

### २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयासाठी अतिरिक्त निधीची मागणी

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१०, जव्हार (पालघर) :** सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी पालघर जिल्ह्यासाठी आरोग्य सुविधा वाढवण्यासाठी खासदार डॉ.हेमंत सवरा यांची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासोबत भेट घेतली. नवी दिल्ली अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांनी राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) आयुष मंत्रालय आणि राज्यमंत्री आरोग्य व कुटुंब कल्याण, भारत सरकार प्रतापराव जाधव यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत पालघर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण म ागण्या मांडण्यात आल्या.

**२०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयासाठी अतिरिक्त निधीची मागणी**

पालघर जिल्ह्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रस्तावित २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी आवश्यक अतिरिक्त निधी त्वरित मंजूर करावा, अशी मागणी खासदार डॉ हेमंत विष्णु सवरा यांनी केली. या



प्रकल्पासाठी सुरुवातीस २०९११.११ लाख रुपये निधीला प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. मात्र, विविध कारणांमुळे आणि सुधारित जीएसटी नियमांम ुळे अंदाजपत्रक वाढून ३३५७३९. ९१ लाख रुपये झाले असून या प्रकल्पासाठी अतिरिक्त ११४८२८. ८० लाख रुपये निधी आवश्यक आहे. यामुळे पालघर जिल्ह्यातील नागरिकांना मुंबई, ठाणे किंवा इतर ठिकाणी उपचारांसाठी जाण्याची गरज भासणार नाही आणि त्यांना स्थानिक पातळीवरच चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध होतील. या संबंधी माननीय केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी त्वरित दखल घेत पालघरचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सविस्तर माहिती घेतली तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा केली. योग्य त्या उपाययोजना त्वरित राबविण्याचे आश्वासन दिले.

**पालघर जिल्ह्यात 'आयुष केंद्र' स्थापन करण्याची मागणी**

पालघर जिल्ह्यातील आदिवासी व ग्रामीण भागातील नागरिकांना पारंपरिक आणि समग्र वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत, तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधांचा विस्तार व्हावा, यासाठी 'आयुष केंद्र' स्थापनेची मागणी करण्यात आली. आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी (AYUSH) प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांना स्वस्त आणि दर्जेदार उपचार मिळावेत, यासाठी केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी विनंती करण्यात आली. या महत्त्वाच्या मागण्यांची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गंभीर दखल घेतली असून पालघर जिल्ह्यातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय घेतले जातील. असे आश्वासन त्यांनी दिले.

## पुणे जिल्हाधिकारी डुडी यांना रिपाई सचिन खरात गटाचे निवेदन

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१०, पुणे :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) यांच्या वतीने मुख्य संघटक म हाराष्ट्र राज्य फिरोज मुल्ला व पश्चिम महा.अध्यक्ष व पुणे शहर अध्यक्ष राजाभाऊ कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना खालीलप्रमाणे मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी पुणे जिल्हा अध्यक्ष राहुल घोडके, पुणे जिल्हा उपाध्यक्ष अक्षय कटके, शकीलाताई मुल्ला, शिक्षण हक्क मंच्याचे अध्यक्ष मतीनभाई मुजावर, जेष्ठ नेते चांदभाई बलबट्टी युवा नेते संदीपभाऊ शेंडगे, युसूफभाई बागवान, अस्लमभाई वाठारे, दोलतभाई पिरजादे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

१) अल्पसंख्याक आयुक्तालय व MRTI यांचे कामकाज व योजनासाठी किमान १००० कोटी निधीची मंजुरी द्यावी. २)जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी म्हणुन तहसीलदार दर्जाचे स्वतंत्र अधिकारी नियुक्ती द्यावी. ३) राज्य वक्फ बोर्डला खअड /खझड दर्जाचे



जिल्हा अल्पसंख्यक अधिकारी पदावर स्वतंत्र अधिभार अधिकारी नियुक्ती मंजुर करावी.

याचप्रमाणे अल्पसंख्याक आयुक्त या पदावर सुद्धा स्वतंत्र अधिकारी नियुक्ती करावी. ४)अल्पसंख्याक विकास विभागासाठी २०२५-२६ या वर्षासाठी एकुण बजेटच्या किमान १-३ टक्के बजेट म्हणजे किमान ६००० कोटी ची तरतुद मंजुर करुन निधी उपलब्ध करावा. ५)प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हा अल्पसंख्याक शाखा कार्यान्वित करुन जिल्हा अल्पसंख्याक विकास संनियंत्रण समिती स्थापन करून तिमाही आढावा बैठकीतुन विविध उपक्रम तयार करुन नवीन मुख्यमंत्री अल्पसंख्याक विकास कार्यक्रम मंजुर करावा. ६) हेटस्पिचेस, मोबलिंचींग चे वाढत्या घटनामुळे मुस्लीम संरक्षण कायदा तैयार करुन मंजुर करावा. ७) प्राथमिक शिक्षण घेणारे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वार्षिक किमान ३ ते ५ हजार रूपयाँची शिष्यवृत्ती योजना मंजूर करावी. ८) प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी नविन विद्यालय सुरु करावे. ९) अल्पसंख्यक कौशल्य विदयापिठ मंजुर करावे.

१०) संयुक्त राष्ट्रसंघ व राष्ट्रीय अल्पसंख्यक आयोगाने निर्देश केलेप्रमाणे अल्पसंख्यांक दिन साजरा करणेसाठी शासन निर्देश दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात सचीव स्तरावर देणेबाबत शासन निर्णय व्हावा. तसेच याबाबतची सविस्तर रुपरेषा शासनाकडून तयार होवुन देणेत यावी. यामध्ये सामाजिक संस्थाचा सहभाग व्हावा. ११)हायकोर्टाने निर्देशीत केलेप्रमाणे मुस्लिम ासाठी शैक्षणिक ५% आरक्षण मंजुर करावे.अशा म ागणीचे निवेदन देण्यात आले.

## बारावी परिक्षेला दांडी मारत दिप्तीची सुवर्ण भरारी ; मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये दिप्ती-सौरभला सुवर्ण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, हल्दवानी :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या शेतकर्यांच्या मुलांनी सुवर्णयशाला गवसणी देत स्पर्धेचा १४ वा दिवस गाजविला. मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये शेतकरी कुटुंबियातील दिप्ती काळमेघसह सौरभ पाटीलने सुवर्ण पदकाला गवसणी घातली.अम रावतीच्या दिप्तीने पदार्पणातच सुवर्णसह रौप्य पदकाची, तर कोल्हापूरच्या सौरभने सलग दुसर्यांदा सुवर्ण भरारी घेतली.१२वी परिक्षेला दांडी मारत दिप्तीने सुवर्ण भरारी घेतली आहे.

गौलापार येथे सुरू असलेल्या मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये सलग दुसर्या दिवशी जय महाराष्ट्राचा जयजयकार घुमला. बारावीत शिकणार्या १७ वर्षीय दिप्ती काळमेघने सकाळच्या सत्रात बायथले प्रकारात रूपेरी यश संपादन केले. दुपारच्या सत्रात दिप्तीने सौरभ पाटीलसह सोनेरी यशाला गवसणी घातली. अमरावतीच्या शेतकर्याची मुलगी असणारी दिप्ती ही पुण्यात शॉर्क जलतरण क्लबमध्ये शेखर खासनीस




यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. दिप्ती काळमेघ ही अमरावतीच्या शिवाजी कॉलेजमध्ये बारावीत विज्ञान शाखेत शिकत आहे. मंगळवार ११ फेब्रुवारीपासून तिची बोर्ड परिक्षा सुरू होत आहे. तरीही पहिले तीन विषयाच्या पेपरला दांडी मारून तिने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत खेळण्याचा मोठा निर्णय घेतला. तो आज सार्थकी ठरला. १६ फेब्रुवारीला शेवटचा क्रीडाप्रकार खेळून ती अमरावतीला परिक्षा देणार आहे. राहिलेले विषयांची परिक्षा पुढील सत्रात देण्याचा धाडसी निर्णय तिने स्पर्धे पूर्वीच घेतला होता. या तिच्या निर्णयाचे कौतुक होत आहे. मॉडर्न पेंटॅथलॉनमधील बायथले मिश्र रिले प्रकारात महाराष्ट्र सुरूवातीपासून आघाडीवर राहिला. सौरभ पाटील व दिप्ती काळमेघ जोडीने ही शर्यत १५.१६.८३ मिनिटांत पूर्ण करीत सुवर्ण यश खेचून आणले. मध्यप्रदेशला रौप्य, तर गुजरातला कांस्य पदक मिळाले. १६०० मीटर धावणे, २०० मीटर जलतरण आणि १६०० मीटर धावणे प्रकाराच्या वैयक्तिक बायथले शर्यत दिप्तीने १६.३९.१० मिनिटांत पूर्ण करून दुसरे स्थान संपादन केले. मध्यप्रदेशच्या रमा सोनगरने सुवर्ण, तर उत्तराखंडच्या भार्गवी रावतने कांस्य पदक जिंकले.

पुरूषांच्या जलतरण स्पर्धेतील वैयक्तिक प्रकारात पूर्ण कॉश्युम फाटल्याने सौरभला पदकापासून वंचित रहावे लागले. गत गोवा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सौरभने १ सुवर्ण १ रौप्य पदक जिंकले होते. २४ वर्षीय सौरभ पाटीलही याच क्लबमध्ये गेली ८ वर्ष सराव करीत आहे. सौरभचे वडिल संजय पाटील शेतीसह पतसंस्थेत काम करतात. दिप्ती व सौरभ या दोघांनाही शेखर खासनीस हे विनामुल्य प्रशिक्षण देत आहेत.

# एसटी कर्मचाऱ्यांनी प्रवासी सेवा हिचं ईश्वर सेवा समजून काम करावे - उपमुख्यमंत्री शिंदे




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, ठाणे :** एसटीच्या पुनरुत्थानासाठी एसटी कर्मचाऱ्यांनी प्रवासी सेवा हीच ईश्वर सेवा! समजून काम केले पाहिजे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास आमचे शासन सक्षम आहे. असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते खोपट बसस्थानकावरील नुतनीकरण करण्यात आलेल्या वातानुकूलित चालक - वाहक विश्रांतीगृहाच्या लोकार्पण सोहळ्याच्या वेळी बोलत होते. या कार्यक्रमाला राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह एस.टी. महामंडळाचे प्रभारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनराव हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एसटीचा चेहरा - मोहरा बदलून फाईव्ह स्टार परिवहन सेवा निर्माण करणे हे आपल्या शासनासमोरील प्रमुख ध्येय असून प्रवाशांना एअरपोर्ट सारखी बसपोर्ट उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी - सार्वजनिक भागीदारीतून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर एसटी महामंडळाने भर दिला पाहिजे. मागील वर्षी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून ५०० कोटी रुपये खर्चून एसटीच्या १९१ बसस्थानक परिसराचे काँक्रिटीकरण करण्याचे काम आपण हाती घेतले असून खड्डेमुक्त बसस्थानक हा आपला संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

एसटी च्या चालक वाहकांना आपले कर्तव्य करून आल्यानंतर ताण - तणाव मुक्त झोप मिळावी यासाठी प्रत्येक आगारांमध्ये वातानुकूलित, स्वच्छ व टापटीप असे विश्रांतीगृह निर्माण करण्यात यावे असे निर्देश त्यांनी यावेळी एसटी प्रशासनाला दिले. खोपट बसस्थानकावरील नुतनीकरण केलेल्या विश्रांतीगृहाबाबत समाधान व्यक्त करून हे रोल मॉडेल संपूर्ण राज्यभर राबवण्याच्या सूचना देखील त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी बोलताना राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी यापुढे राज्यभरात सार्वजनिक - खाजगी भागीदारीतून निर्माण होणाऱ्या प्रकल्पामध्ये आगार तेथे १०० खाटांचे कॅशलेस रुग्णालय उभारण्याच्या संकल्प असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा दिनी या योजनेचा आम्ही शुभारंभ करीत आहोत. भविष्यात या रुग्णालयांमध्ये शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेबरोबर विविध वैद्यकीय सेवा सुविधा मोफत एसटीच्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून त्याचा फायदा त्या परिसरातील प्रवासी व सर्वसामान्य जनतेला देखील मिळणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने एसटी कर्मचारी व प्रवासी उपस्थित होते.

# अलिबागमध्ये श्री केशव गोधन समृद्धी केंद्र गोशाळेचे उद्धाटन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, अलिबाग (रायगड) :** भुक्त्वा तृणानि शुष्कानि पीत्वा तोयं जलाशयात् । दुग्धं ददति लोकेभ्यो गावो विश्वस्य मातरः।।

(म्हणजेच गाय भूक लागल्या नंतर वाळलेले गवत खाते व जलाशयातले पानी पिते तरीही लोकांना शांतता मिळेल असे दुध देते म्हणून गाय ही लोकांची आई आहे.)

आपण अनेक वेदात वाचले आहे गाईची सेवा म्हणजे ईश्वर सेवा. आणि हीच गाय दुध देण बंद झालं कि रस्त्यावर बेवारस फिरत असते.आणि रस्त्यावरून जाणाऱ्या फुल्ल स्पीड वाहनां मुळे तिचा अपघात होतो आणि त्यात ती जखमी होते तर कधी मूत्यूला सामोरी जाते... किती तरी गोमातेची पिशवी बाहेर येऊन रक्तस्त्राव होताना दिसतो. तर कधी पायावरून वाहन गेल्या मुळे जखमी पाय खेऊन लंगडत चालत असते. त्या जखमेत किती तरी जंतू होतात. उन्हाळ्यात रस्तावर प्यायला पोटभर पाणी देखील मिळत नाही.

रस्तावरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यातील अन्न खाताना प्लास्टिक पोटात जाऊन जाऊन मृत्यू पावतात. एखाद्या दुकानाच्या मोकळ्या जागेत बसली कि दुकानदार काठी घेऊन बाहेर हाकलवतो मग पाऊस असो किव्हा उन्हाळा नाहीतर दुकानाच्या मोकळ्या जागेला दोरीने कंपाउंड करतो का तर गोमाता आश्रयासाठी येऊन शेण टाकून जाते व घाण करतात. म्हणून ह्या सर्व अडचणीतून तीच ती आयुष्याभर हिंडत फिरत बेवारस फिरणारी गाय कधी डोळ्यासमोर अचानक गायब होते. जी त्या भागामध्ये परत दिसत नाही. खरं तर आपण लहानपणापासून शाळेत शिकलोय गाय ही पाळीव प्राणी आहे आणि तिला आपण रस्त्यावर बेवारस फिरताना बघतो. अशा गाई रस्त्यावर बेवारस फिरू नये.

यासाठी उज्वल भविष्य सामाजिक संस्था अंतर्गत श्री केशव गोधन समृद्धी केंद्राचे उद्घाटन उज्वल भविष्य संस्थेचे सल्लागार डॉ.नितीन गांधी तसेच माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ.राजाराम हुलवान यांच्या शुभ हस्ते झाले.

याप्रसंगी उज्वल होम नर्सिंग सेवा दवाखान्यातील डॉ.आनन पाटील, पाटील, संस्थेच्या समन्वयक रिंकू पाटील आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.गाय ही सर्वांची गोमाता आहे. तिचे संरक्षण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे म्हणूनच आपल्या परिसरात गोशाळा उभी करून त्याचा सर्वांना कसा उपयोग होईल. या उद्देशाला धरून संस्थेने विचार केला आहे. तसेच ज्या घरात गाई आहेत आणि त्या दूध देत नाही अश्या गोमाता कुटुंबासाठी संस्थेकडून विनामूल्य घरीच संगोपन आणि इतर गोष्टीसाठी संस्थे मार्फत मार्गदर्शन केले जाईल. तसेच शेतकऱ्यांसाठी दुभती गाय दानशूर व्यक्तींकडून पुरवण्याची व्यवस्था तसेच दूध संकलन केंद्र चालू करून शेतकऱ्यांना सोयीचे होईल असे उत्पन्नाचे साधन चालू करण्याचे आमच्या संस्थेचा मानस आहे असे उज्वल भविष्य संस्थेच्या अध्यक्षा उज्वला चंदनशिव यांनी सांगितले. तरी भाकड गाईचे संगोपन आमच्याकडे करण्याचा प्रयन्त आम्ही करणार आहोत. तरी समाजातील दानशूर व्यक्तींनी सढल हाताने दान करावे व गोसंगोपनासाठी केलेल्या दानासारखे दुसरे पुण्य नाही. असे डॉ.नितीन गांधी यांनी सांगितले.

# डोंबिवलीत 'फिनशार्प सहकारी बँक' बनावट असल्याचा संशय; पोलिसांकडे सखोल चौकशीची मागणी






**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पूर्वेतील आगकर रोड परिसरात नुकतीच सुरू झालेल्या फिनशार्प सहकारी बँक विषयी मोठा खुलासा झाला आहे. प्राथमिक चौकशीत ही बँक बनावट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सामान्य ठेवीदारांची फसवणूक होण्याची शक्यता लक्षात घेऊन रामनगर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिनशार्प सहकारी बँक या नावाने सुरू करण्यात आलेल्या या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी कायदा अंतर्गत झालेली नाही. तसेच, बँकेच्या अधिकृत मंजुरीसाठी आवश्यक असलेले रिझर्व्ह बँकेचे कोणतेही प्रमाणपत्र नाही. विशेष म्हणजे, रिझर्व्ह बँकेने २००२ नंतर कोणत्याही नवीन सहकारी बँकेला परवानगी दिलेली नाही, हे अधिकृत नोंदींवरून स्पष्ट होते. संचालक व कर्मचाऱ्यांची माहिती संदिग्ध बँकेमध्ये चौकशी केल्यावर आणखी संशयास्पद बाबी समोर आल्या आहेत. संस्थेचे संचालक मंडळ अस्तित्वात नसून, केवळ चार जण हे संचालक असल्याचे समजते. तसेच, बँकेत कार्यरत कर्मचाऱ्यांना मूलभूत आर्थिक प्रश्नांची उत्तरे देता येत नव्हती. हे सर्व संशयास्पद असल्याने ठेवीदारांची फसवणूक होण्याचा धोका संभवतो. अवास्तव व्याजदर आणि फसवणुकीचा अंदाज बँकेत मुदत ठेवीबाबत विचारणा केली असता, २ वर्षांच्या ठेवीवर १२.५०% इतका अवास्तव व्याजदर सांगण्यात आला. हा दर सध्याच्या आर्थिक परिस्थितीशी विसंगत असल्याने, नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होण्याची शक्यता आहे.

पोलिसांकडून सखोल चौकशीची मागणी सामान्य नागरिकांच्या हितासाठी या बोगस बँकेची तातडीने चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यापूर्वी 'तोरेस' प्रकरणात अनेक ठेवीदारांची कोट्यवधींची फसवणूक झाल्याचे लक्षात घेऊन, या प्रकरणात पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अन्यथा सामान्य जनतेच्या पैशांवर गंडा घालून संबंधित आरोपी पसार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# टेबल टेनिस मधील महिला गटात महाराष्ट्राला रौप्य - अंतिम सामन्यात पश्चिम बंगालकडून पराभूत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, उत्तराखंड :** उत्कंठापूर्ण लढतीत महाराष्ट्राला टेबल टेनिस मधील महिलांच्या सांघिक अंतिम सामन्यात पश्चिम बंगाल संघाकडून १-३ असा पराभव पत्करावा लागला त्यामुळे त्यांना ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अटीतटीने झालेल्या या लढतीमधील पहिल्या सामन्यात महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिला सुतीर्था मुखर्जी हिच्याकडून ८-११, ११-६, १२-१४, ११-२, ५-११ असा पराभव पत्करावा लागला. त्यानंतर महाराष्ट्राची कर्णधार दिया चितळे हिन अहीका मुखर्जी हिच्यावर १२-१०, ११-६, ११-६ असा विजय मिळवित १-१ बरोबरीसह सामन्यातील उत्कंठा वाढविली. एकेरीच्या तिसऱ्या सामन्यात महाराष्ट्राच्या तनिषा कोटेचा हिला पोयमाती बैस्या हिच्याकडून ८-११, ७-११, ११-६, ६-११ अशी हार पत्करावी लागली. एकेरीच्या चौथ्या लढतीत महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिला अहिका मुखर्जी हिने ११-८, ११-६, १३-११ असे पराभूत करीत बंगालच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

महिलांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राने हरियाणाचा ३-० असा पराभव केला. त्यावेळी एकेरीच्या पहिल्या सामन्यात महाराष्ट्राची कर्णधार दिया चितळे हिने स्नेहा भौमिक हिच्यावर११-३, १२-१४, ११-८, १२-१० अशी मात केली. शेवटच्या गेम मध्ये दोन गुणांनी पिछाडीवर असलेल्या दिया हिने टॉप स्पीन फटक्यांचा बहारदार खेळ करीत विजयश्री खेचून आणली. पाठोपाठ महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिने पृथ्वीकी चक्रवर्ती हिचा ११-६, ११-२, ११-९ असा सरळ तीन गेम्समध्ये पराभव करीत महाराष्ट्राला २-० अशी आघाडी मिळवून दिली. एकेरीच्या तिसऱ्या लढतीत महाराष्ट्राच्या तनिषा कोटेचा हिने श्रीदतरी रॉय हिला ११-६, ७-११, ११-७, ११-३, ११-६ असे पराभूत केले आणि महाराष्ट्राच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

पुरुष उपांत्य सामन्यात महाराष्ट्राने बलाढ्य तेलंगणा संघाला ३-० असे पराभूत करीत सनसनाटी विजय नोंदविला. त्यावेळी महाराष्ट्राकडून जश मोदी याने फ्रेडेल रिफीक याचा ११-६, ११-७, ११-९ असा सहज पराभव केला. त्याने काउंटर अटॅक पद्धतीचा सुरेख खेळ केला. पाठोपाठ रेगन अल्बुकर्क याने मोहंमद अली याच्यावर ११-९, ११-९, ११-६ असा सरळ गेममध्ये विजय मिळविला. तिसऱ्या लढतीत महाराष्ट्राच्या चिन्मय सोमय्या याने स्वरमेंदु सोम याला १०-१२, ११-१, ११-९, ११-३ असे पराभूत केले आणि महाराष्ट्राचा अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित केला. पहिली गेम गमावल्यानंतर सोमय्या याने टॉप स्पिन फटके व प्लेसिंग याचा सुरेख खेळ करीत विजयश्री मिळविली. महाराष्ट्र संघाचे प्रमुख संजय शेटे, स्मिता शिरोळे, सुनील पूर्णपात्रे यांनी महाराष्ट्र संघास भेट देऊन प्रोत्साहन दिले.


# थोडक्यात

## मोफत जयपुर फुट शिबिरात १७४ दिव्यांगांची तपासणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०,पैठण (छ.संभाजीनगर) :** आंतरराष्ट्रीयसहकार वर्ष २०२५ निमित्त पैठण येथील शालिवाहन पतसंस्थेच्या वतीने आयोजित कृत्रिम हात व पाय बसविण्याचे मोफत जयपुर फुट शिबिरात १७४ दिव्यांगांची तपासणी करण्यात आली. चेअरमन किशोर चौहाण यांचे नेतृत्वाखाली शालिवाहन पतसंस्थेचे बँकिंग क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्य ही कौतुकास्पद असून त्यांचा आदर्श इतर पतसंस्थांनी घ्यावा. असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सिद्धेश्वर भोरे यांनी केले. रविवार, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे येथील साधू वासवानी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत जयपुर फुट शिबिराप्रसंगी बोलतांना निवेदक किरण गाडेकर यांनी जी माणसे इतरांना हसवितात त्यांच्यासाठी साक्षात ईश्वर प्रार्थना करत असतात. आज शालिवाहन पतसंस्थेमुळे अनेक दिव्यांगांच्या चेहर्यावर आनंदी व समाधानाचे भाव दिसत आहे. आजचा हा कार्यक्रम केवळ भव्य नसून खर्या अर्थाने दिव्य आहे. कारण याला कर्माचे अधिष्ठान लाभले आहे. शालिवाहन पतसंस्था करत असलेले सामाजिक कार्य हेच खर्या अर्थाने गंगास्नान असल्याचे त्यांनी संगितले. प्रा. संतोष गव्हाने यांनी, समाजाला जिथे गरज असते तिथे शालिवाहन पतसंस्था उभी राहिलेली आहे. कोरोना काळात शालिवाहन पतसंस्थेचे कार्य हे डोळे दिपवणारे होते. शालिवाहन राजाच्या नावाला जाणारी ही पतसंस्था असल्याचे त्यांनी संगितले. चेअरमन किशोर चौहन यांनी आपल्या प्रास्ताविक मध्ये, डॉ. अब्दुल कलाम यांनी पोलिओग्रस्त बालकांना कृत्रिम पायाद्वारे खेळतांना बघून, आपल्या जीवनातील हा सर्वात आनंदाचा क्षण असल्याचे उद्गार काढले होते त्याच प्रमाणे आज उपस्थित दिव्यांग बांधवांच्या चेहर्यावरील समाधान व आनंद बघून खूप समाधान वाटत आहे. शालिवाहन च्या सर्व कर्मचार्यांमध्ये असणारा समर्पण भाव यामुळे त्याचे खरे मानकरी सर्व कर्मचारी असल्याचे त्यांनी संगितले. साधू वासवाणी मिशन चे डॉ. सलिल जैन, मिलिंद जाधव, ढगे यांचे मार्गदर्शनाखाली सर्व दिव्यांगांची तपासणी करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व दिव्यांग बांधवांसाठी शालिवाहन पतसंस्थेच्या वतीने जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. या प्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, सहायक निबंधक बलरम नवथर, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सदस्या रेखाताई कुलकर्णी, पाचोड चे सरपंच शिवराज भुमरे, माजी नगराध्यक्षा राखी परदेशी, माजी नगराध्यक्ष सर्वश्री दत्ता गोर्डे, सूरज लोळगे, चन्द्रशेखर पाटील, राजू गायकवाड, अनिल घोडके, माजी नगरसेवक जितू परदेशी, शिवसेना महिला जिल्हा संघटक पुष्पाताई गव्हाणे, दखणी स्वराज्य चे संपादक प्रा. संतोष तांबे, प्रा. संतोष गव्हाणे, किरण गाडेकर, पवन लोहिया, तुषार पाटील, बलराम लोळगे, माजी नगरसेवक अप्पासाहेब गायकवाड, सोमनाथ परळकर, एकनाथ पटेल, राजपूत पंच कमिटी महिला मंच च्या अध्यक्षा देवकाबाई परदेशी व सर्व सदस्या, ताराचंद शिंगवी, सुनील नलभे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. जयंत जोशी, सचिव प्रकाश कसलीवाल, संचालक सर्वश्री दीपक आहुजा, दीपक लखमले, डॉ. पंडित किल्लारीकर, अॅड. राजेंद्र गोर्डे, गणेश लोहिया, सुनील शेळके, बाबासाहेब राऊत, सुमन ताई मस्के, गांगपूर शाखा सल्लागार कमलाकर साबने आदि मान्यवरांसह मोठ्या संख्येने पैठण तालुक्यातील ग्रामस्थ, दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके यांनी केले. शिबीर याशिस्वीतेसाठी सर्व शालिवाहन परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

## कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभागाला निवेदन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** कार्यकारी अभियंता पालखेड पाटबंधारे विभाग नाशिक यांना महाराष्ट्र राज्य शिव आनंद शेत रस्ते चळवळ यांनी निवेदन दिले. त्यांच्या निवेदनात असे म्हटले आहे की, गेली ४० दिवस झाले असून, मागणीप्रमाणे कुठलीही कार्यवाही केलीली नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य शिव आनंद शेत रस्ते चळवळीचे समन्वयक दादासाहेब जंगले पाटील व या चळवळीचे प्रणिते शरदराव पवळे यांचे मार्गदर्शनाखाली मान. राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देताना चळवळीचे निफाड तालुका कृती सदस्य विजय दरेकर व आकाश सालगुडे व इतर निवेदनातील मागणीचा असे थोडक्यात असा कार्यकारी अभियंतापाटबंधारे विभाग नाशिक यांचे कार्यक्षेत्रातील निफाड तालुक्यातील कालवे व चाऱ्या, उपचाऱ्या यांचे भराव्यावरून असलेले रस्ते काही ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. काही ठिकाणी बंद आहे. ते शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी खुले करून द्यावे, अशी विनंती राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे.

## महापालिकेच्यावतीने शिवजयंती मिरवणूक नियोजन बैठक संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, पनवेल :** दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने लोकसहभागातून महानगरपालिकेच्या सहकार्यातून पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येणार आहे. पनवेल शहरामधील मिरवणूकीच्या नियोजनाची बैठक आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये (दि.१०) घेण्यात आली. यावर्षी महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

याचे नियोजन आजच्या बैठकित करण्यात आले. यानिमित्ताने लेझीम पथक, चित्ररथ, ढोल पथक, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा यांची स्पर्धा होणार आहे. या मिरवणूकीमध्ये विविध शाळांनी, संस्थानी सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेने केले असून आपल्या सहभागाची पूर्व नोंदणी महापालिकेकडे करणे गरजेचे असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी यावेळी सांगितले.

याबरोबरच सहाय्यक पोलिस निरीक्षक पटेल यांनी छत्रपती शिवाजी महाराज भव्य मिरवणूकीस सर्व नागरिकांनी शांततामय वातावरणात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच नागरिकांच्या सूचना लक्षात घेऊन स्वच्छता विभाग, सुरक्षा विभागास, विद्युत विभागास छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिवशी चोख व्यवस्था ठेवण्याबाबत यावेळी सूचित केले. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचा खर्च लोकसहभागतून केला जाणार आहे. नागरिकांनी या मिरवणूकीसाठी लोकवर्गणी देण्यासाठी महापालिकेशी संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने यावेळी करण्यात आले.